**D-2**
**Batch 2022-23**

# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

## बी. ए. – (विशारद) सामाजिकशास्त्रे/ योग

**परीक्षा : जानेवारी – २०२३**

**प्रथम सत्र**

**विषय:– व्यावहारिक मराठी (BAM- 101)**

**दिनांक : १७/०१/२०२३** **गुण : ६०** **वेळ : स. १०.०० ते दु. १२.३०**

**सूचना :**
१. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
२. उजवीकडील अंक त्या प्रश्नांचे गुण दर्शवितात.
३. उत्तरपत्रिकेत प्रश्नपत्रिकेतील प्रश्नक्रमांक लिहिणे आवश्यक आहे.

**प्र.१. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा.** (२०)

१. स्त्रीशिक्षणाची गरज
२. शेतकऱ्यांच्या आत्महत्या
३. विज्ञान : शाप की वरदान
४. थोर समाजसुधारक – लो. टिळक
५. मी मुख्यमंत्री झालो तर .....

**प्र.२.अ) खालीलपैकी एका विषयावर पत्रलेखन करा.** (१०)

१. तुमच्या सोसायटीतील पाण्याचा पाईप फुटला आहे. तो दुरूस्त करण्याबाबत अर्ज लिहा.

**किंवा**

२. तुमच्या प्रभागातील कचऱ्याच्या विल्हेवाटीबाबत विनंती अर्ज करा.

**किंवा**

३. महाविद्यालयात ‘शिपाई’ या पदासाठी अर्ज तयार करा.

**ब) इतिवृत्ताचा नमुना तयार करा. (कोणत्याही एक)** (१०)

१. तुमच्या कॉलनीमध्ये २० जून २०१९ ला झालेल्या हनुमान मंडळाच्या सभेचे इतिवृत्त लिहा.

**किंवा**

२. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथील बी.ए. सामाजिकशास्त्रे माहितीपत्रकाचा नमुना तयार करा.

**प्र.३. चित्रफितीसह जाहिरात लेखन करा. (कोणत्याही दोन विषयावर)** (१०)

१. जाहिरात म्हणजे काय ? ते सांगून पुढे दिलेल्या कोणत्याही दोन विषयावर आकर्षक जाहिरात लेखन चित्रफितीसह करा.
   १. अंजनी साडीसेल
   २. प्रवीण लोणचे मसाला
   ३. लक्स साबण

**प्र.४. खालील उताऱ्याचा सारांश लिहून योग्य शीर्षक द्या. (१०)**

लोकशाहीचे अस्तित्व टिकविण्यासाठी आपणाला दुसरी जी गोष्ट करावयाची आहे ती ही की, लोकशाहीचा झेंडा सतत उंच ठेवण्यास जे उत्सुक आहेत, त्यांच्यासाठी जॉन स्टुअर्ट याने जो भयसूचक संदेश दिलेला आहे तो पाळणे, ही होय. तो संदेश असा : आपल्यातील एखादा माणूस कितीही मोठा असला तरी त्याच्या चरणी आपल्या व्यक्तिस्वातंत्र्याची सुमने वाहू नयेत. ज्यांनी आयुष्यभर आपल्या मायभूमीची सेवा केलेली आहे, अशा थोर व्यक्तिंबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे यात काही चूक नाही; परंतु कृतज्ञता व्यक्त करण्यालासुध्दा मर्यादा आहेत. या बाबतीत आयर्लंडचा देशभक्त डॅनियल ओ कोनेल याने मार्मिकपणे म्हटलेले आहे की, स्वाभिमानाचा बळी देऊन कोणताही मनुष्य कृतज्ञता व्यक्त करू शकणार नाही. शीलाचा बळी देऊन कोणतीही स्त्री कृतज्ञ राहू शकणार नाही.